महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग ,शासन निर्णय क्रमांक मलोआ - ११२६ / प्र. क्र. २३९ / मलोआ, दि.०४/०९/२०२६

**विषय:-** राज्यातील विद्यमान भरती परीक्षा पध्दतीचा सर्वकष अभ्यास करुन आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक मलोआ- ११२६ / प्र. क्र. २३९/ दि.०४/०९/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९०५१३५४४७३३०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Anita Pitambar Rathod
Date: 08-09-2026
18:43:13

( अनिता राठोड )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस महासंचालक यांचे स्वीय सहायक
विशेष पोलीस महानिरीक्षक,आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उप सहायक
कार्यासन अधिकारी, का क्र.१

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील विद्यमान भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन निर्णय क्रमांक : मलोआ ११२६/प्र.क्र.२३९/मलोआ
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ४ सप्टेंबर, २०२६

**प्रस्तावना :**

राज्य शासनामार्फत घेण्यात येणारी विद्यमान भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित, विश्वासार्ह, उमेदवाराभिमुख होण्याच्या दृष्टीने तसेच गैरप्रकार व अनुचित साधनांना प्रतिबंध होण्याच्या दृष्टीने विद्यमान परीक्षा पद्धतीचा सर्वंकष आढावा घेण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने प्रश्नपत्रिका तयार करणे व त्यांचे परीक्षण, गोपनीयता व सुरक्षित हाताळणी, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन व सुरक्षा, तंत्रज्ञानाचा वापर, अनुचित प्रकारांना प्रतिबंध, विविध यंत्रणांमधील समन्वय, तक्रार निवारण तसेच उमेदवारांचा एकूण परीक्षा-अनुभव यांसह परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्याने मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीत, विद्यमान परीक्षा पद्धतींचे संपूर्ण पुनर्विलोकन करून राज्यातील भरती परीक्षांमध्ये सर्वंकष सुधारणा सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्रातील भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी शासन पुढीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठित करीत आहे :

| अ. क्र. | अधिकारी | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती व्ही. राधा | अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा) | अध्यक्ष |
| २ | श्री. सदानंद दाते | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३ | श्री. वीरेंद्र सिंह | सचिव,इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | डॉ. एन. रामास्वामी | सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | सदस्य सचिव |
| ५ | श्री. प्रवीण गेडाम | विभागीय आयुक्त, नाशिक विभाग | सदस्य |
| ६ | एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त), AVSM, VSM | माजी सदस्य, संघ लोकसेवा आयोग (UPSC) | सदस्य |
| ७ | प्रा. श्यामप्रसाद करगड्डे | प्राध्यापक, यांत्रिकी अभियांत्रिकी विभाग, भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) मुंबई | सदस्य |

२. कार्यकक्षा (Terms of Reference) :

१. राज्य शासनाचे विविध विभाग, प्राधिकरणे व परीक्षा घेणाऱ्या संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या भरती परीक्षांच्या विद्यमान प्रणाली व कार्यपद्धतीचा आढावा घेणे.
२. भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह, निष्पक्ष तसेच उमेदवार व संबंधित हितधारकांना व्यापकपणे मान्य होईल अशी करण्यासाठी सर्वंकष उपाययोजना सुचविणे.
३. प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षण/मॉडरेशन, एकापेक्षा अधिक प्रश्नसंच तयार करणे, मुद्रण अथवा डिजिटल वितरण, गोपनीयता, अभिरक्षा, प्रश्नप्रत्रिका वाहतूक, परीक्षा संचालन, प्रतिसाद नोंदणी, मूल्यमापन व निकाल जाहीर करणे या सर्व प्रक्रियांचा अभ्यास करून योग्य सुरक्षा उपाय सुचविणे.
४. परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञान, डिजिटल प्रणाली व सुरक्षा तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याबाबत तसेच आवश्यक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, लेखापरीक्षण नोंदी (Audit Trails), देखरेख व इतर तंत्रज्ञानाधारित सुरक्षा उपायांबाबत शिफारसी करणे.
५. प्रश्नपत्रिका फुटणे, प्रश्नपत्रिकेची गोपनियता भंग होणे, तोतया उमेदवार, संगनमत, प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर अशा व इतर अनुचित प्रकारांना प्रतिबंध व त्यांचा शोध घेण्यासाठी असलेल्या यंत्रणेचा आढावा घेऊन प्रतिबंधात्मक, पर्यवेक्षणात्मक व उत्तरदायित्वविषयक उपाय सुचविणे.
६. इतर राज्यांमध्ये अवलंबिलेल्या संबंधित उत्तम पद्धतींचा तसेच आवश्यकतेनुसार इतर देशांतील परीक्षा प्रणालींचा अभ्यास करणे.
७. परीक्षा केंद्रांची निवड, पायाभूत सुविधा, देखरेख, सुरक्षा, मनुष्यबळ व कार्यसज्जता यांसाठी किमान मानके सुचविणे.
८. जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागातील प्राधिकरणे, परीक्षा घेणाऱ्या संस्था व इतर संबंधित यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वयासाठी संस्थात्मक कार्यपद्धती सुचविणे.
९. राज्यातील प्रत्येक महसुली विभागास भेट देऊन विद्यार्थी/उमेदवार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी व इतर संबंधित हितधारकांशी चर्चा, सल्लामसलत करणे, त्यांची मते व सूचना विचारात घेऊन कार्यपध्दती सुचविणे.
१०. प्रभावी तक्रार निवारण, उमेदवारांशी संवाद तसेच परीक्षा प्रक्रियेची निष्पक्षता व प्रामाणिकतेबाबत उमेदवारांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी उपाय सुचविणे.

३. उपरोक्त नमूद मुद्यांच्या अनुषंगाने उच्चस्तरीय समितीने सर्वंकष अभ्यास करुन तसेच संबंधित हितधारकांशी प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन माध्यमातून संवाद / सल्लामसलत करून सूचना व अभिप्राय प्राप्त करावेत व सर्वसमावेशक अंतिम अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०९०५१३५४४७३३०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

506bb4e0-1c90-4cb2-82b3-050ccdb14566

Digitally signed by 506bb4e0-1c90-4cb2-82b3-050ccdb14566
DN: cn=506bb4e0-1c90-4cb2-82b3-050ccdb14566
Date: 2026.09.05 15:45:16 +05'30'

**(राजेश अग्रवाल)**
**मुख्य सचिव**

**प्रत :**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाक यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग.
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. सर्व जिल्हाधिकारी.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
९. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा).सचिव.
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य.
३. सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग.
४. सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.
५. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग.
६. एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त), AVSM, VSM, माजी सदस्य, संघ लोकसेवा आयोग (UPSC)
७. प्रा. श्यामप्रसाद करगड्डे, प्राध्यापक, यांत्रिकी अभियांत्रिकी विभाग, भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) मुंबई.